मौजे मलकापुर (कराड), ता.कराड, जि.सातारा या आदिवासी मुलांच्या वसतीगृहासाठी खाजगी इमारत खरेदी करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : आवगृ-१३१९/प्र.क्र.१२९/का.०५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. जमिन-२००९/प्र.क्र.६५/ का.१३, दि.३१.०८.२००९.
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र १००८/प्र.क्र.७०/२००८ विनियम, दि.१७.०४.२०१५.
३) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. ससमा-२०१०/प्र.क्र.४८ (भाग-१)/ का.१४६१, दि. ११.०६.२०१८.
४) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.आवगृ-१३१९/प्र.क्र.३९/का.०५, दि.२१.०८.२०१९.
५) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे दिनांक २२.०८.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना : -

आदिवासी विकास विभागाकडील मंजूर असलेली वसतिगृहे ही मुख्यत: नगरपालिका व महानगरपालिकेच्या क्षेत्रात येतात. नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध असलेली शासकीय जमीन प्राप्त करून त्या ठिकाणी वसतिगृह इमारतीचे बांधकाम करण्यात येते. ज्या ठिकाणी वसतिगृह इमारत बांधकामासाठी शासकीय जमिन उपलब्ध होत नाही त्या ठिकाणी खाजगी जमिन खरेदी करण्याची तरतूद दि. ३१/०८/२००९ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. जमीन प्रत्यक्ष विभागाच्या नावावर होऊन त्यावर प्रत्यक्ष बांधकाम सुरु करून पूर्ण करण्यासाठी अंदाजे ४ वर्षाचा कालावधी लागतो. या कालावधीत वसतिगृहाच्या भाड्याच्या रक्कमेची अदायगी सुरु असते.त्यामुळे खाजगी जमिन खरेदी करण्यासाठी,भाडे अदा करण्यासाठी व प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधीची व यासाठी ४ वर्षाच्या कालावधीची आवश्यकता भासते. तसेच महानगर क्षेत्र जसे ठाणे,पुणे,नागपूर,इत्यादी ठिकाणी जमिनीची कमतरता व नागरी निवासाचा व्यवसाय, अधिक प्रभावी असल्याने शासकीय दराने किंवा बाजारभावानेही खाजगी जमिन शासकीय प्रयोजनासाठी उपलब्ध होत नाही. त्यामुळे वसतिगृहासाठी तयार इमारत आवश्यक बाबींच्या पुर्ततेसह उपलब्ध होत असल्यास आदिवासी विकास विभागाच्या वाचा येथील अनुक्रमांक ४ मधील शासन निर्णयानुसार आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील आदिवासी मुला मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी तयार खाजगी इमारत खरेदी करण्याच्या धोरणास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यानुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचेकडून आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, मौजे मलकापुर (कराड), ता.कराड, जि.सातारा या वसतीगृहासाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त कच्छी प्रॉपर्टीज, वन अर्थ सईदपूर, सातारा यांची तयार खाजगी इमारत खरेदी करण्यासाठीचा रुपये ६,७०,००,०००/- (अक्षरी सहा कोटी सत्तर लाख फक्त) प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाबी शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> : -

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांनी सादर केलेल्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, मौजे मलकापुर (कराड), ता.कराड, जि.सातारा या वसतीगृहासाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त कच्छी प्रॉपर्टीज, वन अर्थ सईदपूर, सातारा यांच्या मालकीची सर्व्हे नं. ५ प्लॉट नं. १ व २ वरील संस्कृती सिटी, डी विंग येथील तयार खाजगी इमारती मधील सर्व १८ सदनिका एकूण क्षेत्रफळ १७६५.१९ चौरस मिटर खरेदीच्या रुपये ६,७०,००,०००/- (अक्षरी सहा कोटी सत्तर लाख फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास पुढील अटीच्या अधीन शासन मान्यता देण्यात येत आहे.

अटी:-

- **प्रस्तुत इमारती बाबत नगररचना विभागाच्या मंजूर आराखड्यामध्ये अथवा प्रारुप आराखड्यामध्ये दर्शविलेला उपयोग (झोन) पाहून वसतिगृहासाठी जमीन वापरा बाबत पुढील अडचण येणार नाही तसेच सदर जमीन इतर कोणत्या प्रयोजनासाठी आरक्षणाखाली नाही याबाबत खात्री करुन घ्यावी. तसेच याबाबत नगर रचना विभाग व महसूल विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.**
- **सदर इमारत पूर रेषेखाली अथवा भूसंपादनासाठी कोणत्या प्रयोजनासाठी निश्चिती केली आहे किंवा कसे याबाबत खात्री करुन घ्यावी.**

तसेच इमारत खरेदी प्रक्रिया राबविताना आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.आवगृ-१३१९/प्र.क्र.३९/का.०५, दि.२१.०८.२०१९ मधील अटींची पूर्तता करण्यात यावी.

२. सदर मान्यता ही वित्त विभाग क्र. विअप्र-१००८/प्र.क्र.७०/२००८ विनियम दिनांक १७ एप्रिल,२०१५ अन्वये प्रस्तृत केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-१, उपविभाग-५, अनुक्रमांक १ नियम क्र. १३४ मधील तरतूदी नुसार, तसेच शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र.ससमा २०१०/प्र.क्र.४८ (भाग-१)/का-१४६१, दिनांक ११ जुन,२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यांत आलेल्या वित्तीय अधिकाराच्या मर्यादेनुसार देण्यात येत आहे.

३. वसतिगृहासाठी इमारत खरेदीसाठी येणारा खर्च हा मागणी क्र. टी-६, लेखाशिर्ष ४२२५, अनुसुचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय कल्याणावरील भांडवली खर्च -०२- अनुसुचित जमातीचे कल्याण- ७९६ जनजाति क्षेत्र उपयोजना-(०२) जनजाति क्षेत्राबाहेरील उपयोजना (०२) (०५) वसतीगृहाचे बांधकाम (कार्यक्रम), (४२२५ १०९२),५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा. सदर प्रकरणी अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१९२५५६५०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Vithalrao Kove

Digitally signed by Satish Vithalrao Kove
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, serialNumber=ce18732734ba0742d7712775e8f0ad400558e8748375399762fd447c3e9ac1eb, cn=Satish Vithalrao Kove
Date: 2019.09.13 19:19:11 +05'30'

(सतिश कोवे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
८. जिल्हाधिकारी, सातारा
९. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक
११.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, धुळे
१२.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१४.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगांव
१५.कक्ष अधिकारी (का.०६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६.निवड नस्ती (का.०५), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.